# जिल्हा परिषद पालघर

आ.क्र.पांजप/ग्रा.पं./कार्या-१/वशी-३२४

दिनांक - १६/०६/२०१९

प्रति,
गट विकास अधिकारी, (उ. श्रे.)
पंचायत समिती, डहाणू

विषय :- मासिक सभेला बसण्यास नकार दिल्याबाबत.
संदर्भ :- १) आपलेकडील पत्र क्र. पंसड/ग्रापंवि/वशी-२३२/२०१९
दिनांक ०५/०३/२०१९.
२) श्री. निलेश केसरीनाथ वावर यांचा दिनांक ०५/०२/२०१९ चा अर्ज.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, श्री. निलेश केसरीनाथ वावर व इतर ग्रामस्थ यांना सरपंच, ग्रामपंचायत चिंचणी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चा नियम ३६ नुसार मासिक सभेस बसण्यास नकार दिला आहे असे श्री. निलेश केसरीनाथ वावरे यांनी तक्रार केली आहे.

सरपंच, ग्रामपंचायत चिंचणी यांनी तक्रारदार श्री. निलेश केसरीनाथ वावर व इतर ग्रामस्थ यांना पत्र देऊन मासिक सभेस बसण्यास नकार दिला आहे. याबाबत गट विकास अधिकारी, (उ.श्रे.) पंचायत समिती, डहाणू यांनी मार्गदर्शन मागितले आहे.

शासन परिपत्रक क्र. पीआरसी १०७७/२७०३/सीआर (२७३२) दिनांक ११.०९.१९७८ नुसार सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गट विकास अधिकाऱ्यांना अशा सूचना देणे आवश्यक आहे की, त्यांनी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत बैठकीसाठी जास्तीत जास्त लोक हजर राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी दयावी. व योग्यती उपाय योजना आखण्यात यावी.

तसेच मुंबई ग्रामपंचायत (सभांबाबत) नियम, १९५९ (क्र.१७६(२), खंड (७) ) मधील नियम १ टिप १ सभेची कार्यरीती यामध्ये पंचायतीची सभा सर्वलोकांसाठी खुली असली पाहिजे असे नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

११/६/१९

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद, पालघर

मिलिंद बोरीकर (भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पालघर

प्रत :- गट विकास अधिकारी, (उ.श्रे.) पंचायत समिती, ......................(सर्व) यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत :- श्री. निलेश केसरीनाथ वावरे, मु. चिंचणी ब्राम्हणआळी, पो. चिंचणी, ता. डहाणू जि. पालघर, यांना माहितीसाठी.



निरीक्षक
19/6/2019

/6/2019

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४
ई मेल: usecpr३.rdd-mh@nic.in

---

क्रमांक :व्हीपीएम-२०२१/प्र.क्र. ६१/पंरा-३ दिनांक:- ०१ मार्च, २०२१

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पालघर.

**विषय:-** ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत नागरिकांना बसण्याचे मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ :-** १) आपल्या कार्यालयाचे दि. ०१.०१.२०२१ रोजीचे पत्र

२) तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, पालघर यांचे दि. १६.०४.२०१९ रोजीचे पत्र.

**महोदया/महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन क्र. १ च्या पत्रान्वये, ग्रामपंचायत चिंचणी ता. डहाणू यांनी ठराव मंजूर करून ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ग्रामस्थांना बसण्यास परवानगी नाकारली असल्याने, ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील नागरिकांना बसण्यास परवानगी देण्यात यावी अगर कसे याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केली आहे.

२. या प्रकरणी आपणास कळविण्यात येते कि, ग्रामपंचायतीच्या सभेबाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. पीआरसी १०७७/२७०३/सीआर (२७३२) दि. ११/०९/१९७८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील मुंबई ग्रामपंचायत (सभांबाबत) नियम १९५९ (क.१७६ (२), खंड (७)) मधील नियम १ टीप १ मधील तरतुदी या स्वयंस्पष्ठ आहेत .तसेच, संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, पालघर यांनी सदर प्रकरणी उपरोक्त नमूद शासन नियमांनुसार कार्यवाही करणेबाबत संबंधितांना आदेश दिले होते. यास व उपरोक्त नमूद शासन नियम यांना अनुसरून या प्रकरणी उचित कार्यवाही आपले स्तरावरून करण्यात यावी, हि विनंती.

सोबत : संदर्भाधीन पत्रे

आपला,

(सुहास जाधवर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, पालघर.

Scanned with CamScanner

# ग्रामसभेच्या बैठकी

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

शासन परिपत्रक क्र. व्ही.पीएम २६८१/१३६२/(३३२२)/२१ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. २१ नोव्हेंबर, १९८९ परिपत्रक क्रमांक वाचा -

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम १२७२/४८००४/ इ. दि. १८-११-७२

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम १३७५/३५५५/२३, दि. १०-२-७६

शासन परिपत्रक क्र. पीआरसी १०७६/२४११/२३, दि. ३१-१-७७

शासन परिपत्रक क्र. पीआरसी १०७७/२७०३/सीआर २७३२ / २३, दि. ११-९-७८

शासन परिपत्रक क्र. पीआरसी १०७६/२४११/सीआर १९२३ / २३, दि. १९-६-७९

शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम २६८७/२८२८, दि. २६-५-८७

## परिपत्रक

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायती तर्फे (प्रत्येक वित्तीय वर्षी) विहित करण्यात येईल अशा तारखेस, वेळी व ठिकाणी ग्रामसभेच्या निदान २ बैठका घेण्यात येतील आणि जर सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच पुरेशा कारणाशिवाय अशा दोन बैठकांपैकी कोणतीही एक बैठक घेण्यात चुकला तर तो सरपंच किंवा यथास्थिती उपसरपंच म्हणून चालू राहाण्यास किंवा पंचायत सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी त्या पदावर निवडला जाण्यास अनर्ह ठरेल व असे पुरेसे कारण होते किंवा नाही या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल.

ग्रामसभेबाबत वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या परिपत्रकाद्वारे वेळोवेळी खुलासा करण्यात आलेला आहे. सदरहू आदेशाचा साकल्याने विचार करून खालीलप्रमाणे आदेश काढण्यात येत आहेत.

**परिपत्रक क्र. व्हीपीएम १२७२/४८००४/इ, दि. १८-११-७२ :-** बोंगिरवार समितीच्या शिफारस क्र. १८६ व १८७ च्या संदर्भात शासनाने असे नमूद केलेले आहे की, कोणताही सरपंच ग्रामसभा घेण्यास चुकला, तर सदरहू ग्रामसभा न घेण्यास पुरेसे कोणते कारण होते याचा खुलासा करण्याची संधी त्याला देण्यात येणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक सरपंच अथवा उपसरपंचाने विहित मुदतीत ग्रामसभा घेतल्या आहेत किंवा नाही यासंबंधी गट विकास अधिकाऱ्यांनी खात्री करून घ्यावी.

**परिपत्रक क्र. व्हीपीएम १३७५/३५५५/२३, दि. १०-२-७६ :-** ग्रामसभेच्या बैठका घेण्यात कसूर झाल्यास सरपंचाप्रमाणे ग्राम सचिवास सुद्धा जबाबदार धरण्यात येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच त्याचप्रमाणे सचिवावर ग्रामसभा योग्य त्या रीतीने घेण्याबाबतची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**परिपत्रक क्र. पीआरसी १०७६/२४११/२३, दि. ३१-१-७७ :-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा व मासिक सभा नियमितपणे न घेणाऱ्या सरपंच व ग्रामसेवकांविरुद्ध कडक कारवाई करावी व ग्रामसभेबाबतचे अहवाल गट विकास अधिकारी अथवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना न पाठविल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात यावी. तसेच ग्रामसभा वेळेवर घेण्यासाठी पोस्टर्स लावून प्रचार करण्यात यावा.

**परिपत्रक क्र. पीआरसी १०७७/२७०३/ सीआर (२७३२) दि, ११-९-७८ :-** सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गट विकास अधिकाऱ्यांना अशा सूचना देणे आवश्यक आहे की, त्यांनी ग्रामपंचायतीच्या

Scanned with CamScanner

प्रसिद्धी द्यावी. व योग्य ती उपाय मासिकसभेत बैठकींसाठी जास्तीत जास्त लोक हजर राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात योजना आखण्यात यावी.

**परिपत्रक क्र. पीआरसी १०७६/२४११/सीआर १९२३२३, दि. १९ जून १९७९ :-** ग्रामसेवकाने सरपंच व उपसरपंच यांना द्याव्या. याबाबतचा अहवाल ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा घेण्यासंबंधीच्या सूचना योग्य त्या वेळी प्राप्त झाल्यानंतर, जो सरपंच ग्रामसभा घेण्याच्या कर्तव्यात चुकेल त्याला यासंबंधीचे कारण देण्यास गट विकास अधिकाऱ्यांनी भाग पाडावे व ज्या ग्रामपंचायती ग्रामसभा घेण्याच्या कर्तव्यात कसूर करतील त्या ग्रामपंचायतींचा ३१ मे पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सादर करावी. त्याचप्रमाणे त्या सरपंचाची नावे गट विकास अधिकाऱ्यांना १५ जून पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी. अशा प्रकारे ३१ मे पूर्वी यादी प्राप्त झाल्यानंतर ही नावे यांना यासंबंधीचे जाब १ महिन्याच्या आत जिल्हाधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करण्यात आलेल्या सरपंच व उपसरपंच सादर करण्याच्या सूचना द्याव्या व त्याच्यावर योग्य ती कारवाई का करण्यात येवू नये अशा प्रकारची नोटीस जिल्हधिकाऱ्यांनी संबंधित सरपंचाना द्यावी. त्यानंतर मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ अन्वये संबंधित सरपंच व उपसरपंच यांच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ योग्य ती कारवाई करावी.

**परिपत्रक क्र. व्हीपीएम २६८७/२८२८/दि. २६ मे १९८७ :-** या परिपत्रकात असे आदेश देण्यात आले आहेत की, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांनी ग्रामपंचायतींची सभा घेण्यात कसूर करणाऱ्या सरपंचावर तत्काळ योग्य ती कारवाई करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वृ. श्री. कुलकर्णी

सहसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग

----------

Scanned with CamScanner

## प्रकरण पंधरा

## नियम व उपविधी

नियम. १७६. (१) राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अदिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) राज्य शासनाला, विशेषतः परंतु पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता पुढील गोष्टी करण्यासाठी नियम करता येतील :—

[१][* * * * * *]

(दोन) कलम ७, पोट-कलम (१) खाली, ग्रामसभेच्या सभा धेण्याचा दिनांक, [२][जागा, वेळ व बोलावण्याची रीत] विहित करणे ;

[३][(दोन-क) कलम १०, पोट-कलम (१), खंड (ख) खाली, ज्या रीतीने प्रभागांची संख्या आणि प्रत्येक प्रभागामधून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निर्धारित करण्यात येईल ती रीत विहित करणे ;]

(तीन) कलम १०, पोट-कलम (२) खाली प्रत्येक पंचायतीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती [४][आणि नागरिकांचा मागासवर्ग व स्त्रिया] यांच्यासाठी [५][राखून ठेवावयाच्या जागांची संख्या [६][राज्य निवडणूक आयोग]

ज्या रीतीने निर्धारित करील ती रीत] [७][आणि [८][अशा जागा राखून ठेवण्याची] रीत व आळीपाळीने जागा राखून ठेवण्याचा क्रम विहित करणे] आणि उक्त कलमाच्या पोट-कलम (३) खाली, पंचायतीच्या निवडून आलेल्या व नेमलेल्या सदस्याची नावे प्रसिद्ध करण्याची रीत विहित करणे ;

(चार) कलम ११ खाली, ज्या रीतीने सदस्यांची निवडणूक करण्यात येईल ती रीत विहित करणे;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ (१) अन्वये खंड (एक) वगळण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ३ अन्वये " जागा व वेळ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ७३ (१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३२ (अ) (एक) अन्वये " राखून ठेवावयाच्या जागांची संख्या विहित करणे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ (२) (अ) अन्वये " जिल्हाधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ९ अन्वये १ जुलै १९९० पासून हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ (२) (क) अन्वये " स्त्रियांसाठी जागा राखून ठेवण्याची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

Scanned with CamScanner

[1][ (चार-कक) कलम २९, पोट-कलम (१) खाली ज्या रीतीने राजीनामा सुपूर्द करण्यात येईल ती रीत विहित करणे ;

[2][ (चार-कककं) कलम ३० अन्वये पंचायतीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या पंचायतीच्या सरपंचांच्या पदांची संख्या आणि अशा आरक्षणाची रीत व आळीपाळीच्या क्रम विहित करणे ; ]

[3][ (चार-क) कलम ३२-क खाली, पंचायतीचा सरपंच आणि उपसरपंच यांसह तिच्या सदस्यांना द्यावयाचे प्रवास भत्ते आणि दैनिक भत्ते विहित करणे ; ]

(पाच) कलम ३३, पोट-कलम (२) खाली अध्यक्षस्थानी असलेल्या [4]* * * * अधिकाऱ्यांचें अधिकार व त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे ;

[5][ (पाच-क क) कलम ३३-क खाली, ज्या रीतीने सरपंचाकडे आतिथ्य भत्ता सुपूर्द करण्यात येईल ती रीत विहित करणे ;]

[6][ (पाच-क) कलम ३४, पोट-कलम (३) खाली, ज्या रीतीने राजीनाम्याची नोटीस सुपूर्द करण्यात येईल ती रीत विहित करणे ;]

(सहा) कलम ३५, पोट-कलम (१) खाली नोटिशीचा नमुना विहित करणे ;

(सात) कलम ३६ खाली, पंचायतीच्या बैठकीची वेळ व जागा आणि सभेतील कार्यपद्धती विहित करणे ;

(आठ) कलम ३८, पोट-कलम (१) खाली, सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंचाने सरपंचाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियम विहित करणे ;

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३२ (अ) (दोन) अन्वये खंड (चार-क क) समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ (३) अन्वये खंड (चार-ककक) समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ७३ (२) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २८६, दहावी अनुसूची अन्वये " जिल्हाधिकाऱ्याचे किंवा इतर " हा मजकूर वगळण्यात आला.

[5] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये खंड (पाच-क क) समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ७३ (३) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

Scanned with CamScanner